**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,**
(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)
**आयएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**
**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**
MCAER कृषि परिषद
ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com
संकेतस्थळ : www.mcaer.org
दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.
फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१२१८/१४८७ दि. ३०जून,२०१८

# परिपत्रक

**विषयः- पदवी प्रवेश प्रक्रिया २०१८-१९ अंतर्गत जात वैधता प्रमाणपत्र दाखल करण्याबाबत.**

संदर्भः- या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१३९४, दि. १९ जून,२०१८

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत बी.एस्सी. (ऑनर्स) (कृषी), बी.एस्सी. (ऑनर्स) (उद्यानविद्या), बी.एस्सी. (ऑनर्स) (वनविद्या), बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी), बी. टेक्. (अन्नतंत्रज्ञान), बी. एस्सी. (ऑनर्स) (सामाजिक विज्ञान) आणि बी. टेक. (जैवतंत्रज्ञान) हया व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या नियंत्रणाखाली दि. ११ जून,२०१८ पासून ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेऊन सदर प्रवेश प्रक्रियेंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात आलेले आहे.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि. १५ जून,२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये जात वैधता प्रमाणपत्रासंदर्भात दिलेल्या सूचना विचारात घेऊन, संदर्भीय परिपत्रकान्वये अशा सूचना देण्यात आल्या होत्या की, प्रवेश अर्ज दाखल करतेवेळी जात वैधता प्रमाणपत्र उमेदवाराकडे उपलब्ध नसल्यास, उमेदवारांनी जात प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत, तसेच जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज सादर केलेला असल्याची संबंधित कार्यालयाची पावती, प्रवेश अर्ज दाखल करतेवेळी अपलोड करावी आणि दि.१४ ते १७ जुलै,२०१८ या तक्रार नोंदणीच्या कालावधीत उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य होते.

तथापि, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) अध्यादेश,२०१८ दि. २४/६/२०१८ मधील कलम ४क (१) (२) (एक) (दोन) (३) (४) मध्ये नमूद केलेल्या बाबींचा सर्वंकष विचार करून उमेदवारांना **जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दि. २१/८/२०१८ हा अंतिम दिनांक निश्चित करण्यात येत आहे.** यासंदर्भात राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या मान्यतेने वेळापत्रकाची प्रत यासोबत जोडली आहे.

admn 18-19

प्रवेश अर्ज दाखल करतेवेळी जात वैधता प्रमाणपत्र उमेदवाराकडे उपलब्ध नसल्यास, उमेदवारांनी जात प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत, तसेच जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज सादर केलेला असल्याची संबंधित कार्यालयाची पावती, प्रवेश अर्ज दाखल करतेवेळी अपलोड केलेली आहे, अशा उमेदवारांना या परिपत्रकाद्वारे खालील सूचना देण्यात येत आहेत.

१. नियोजित वेळापत्रकातील चार ऑनलाईन प्रवेश वाटप फेऱ्यांद्वारे प्रवेशाचे वाटप करतांना, जात प्रमाणपत्रानुसार उमेदवाराचा प्रवर्ग विचारात घेण्यात येईल.

२. अशाप्रकारे आरक्षित प्रवर्गातून प्रवेशाचे वाटप तात्पुरत्या स्वरूपाचे राहील. असे तात्पुरते प्रवेशाचे वाटप झाल्यास, उमेदवारांनी वेळापत्रकात नमूद केलेल्या दि.१६ ते २१ ऑगस्ट,२०१८ या कालावधीत संबंधित महाविद्यालयात सर्व मूळ कागदपत्रे सादर करतांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

३. उमेदवारांनी वरील नमूद केलेल्या दि.१६ ते २१ ऑगस्ट,२०१८ या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र संबंधित महाविद्यालयात सादर न केल्यास, अशा उमेदवाराचे प्रवेश वाटप रद्द करण्यात येईल.

४. यामुळे रिक्त झालेल्या जागा, नियोजित वेळापत्रकात नमूद केलेल्या दि. २७ ते ३० ऑगस्ट,२०१८ या कालावधीतील 'जागेवरील प्रवेश फेरी'द्वारे भरण्यात येतील.

५. प्रवेश वाटप रद्द झालेल्या वरील उमेदवारांना, खुल्या प्रवर्गातील उमेदवार म्हणून 'जागेवरील प्रवेश फेरी'च्या प्रक्रियेमध्ये समाविष्ट होता येईल.

30/8/16

(रविंद्र जगताप) भा प्र से
महासंचालक

प्रतः-

१. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.
यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

२. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड, पुणे ४११ ०२९.
यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक त्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे व परिपत्रकामधील सूचना विचारात घेऊन प्रवेश प्रक्रिया राबवावी.

३. मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, यांना माहितीस्तव सविनय सादर...

GOVT. OF MAHARASHTRA

# STATE CET CELL, MUMBAI

## Schedule of Activities for Admission to first Year of Under Graduate Professional Courses for AY 2018-19

**Name of the Director - Dr. Harihar Kausadikar, Director (Education), MCAER, Pune**

| Sr. no. | Name of the Course | Last Date of Registration | Display of Provisional Merit List | Last date for Submission of Grievances | Display of Final Merit List | Last date for Reporting to alloted institute and submission of Original Documents | | | | As per Ordinance dt. 24/06/2018 Last date for Submission of Caste Validity Certificate of Candidate (Course wise) | Special round/Spot Admssion Round for Admission of Vacancy due to Non submission of caste validity Certificate | Cut off date of admission |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | CAP I | CAP II | CAP III | CAP IV | | | |
| 1 | B.Sc. (Hons) Agriculture | 7/7/2018 | 13-07-2018 | 17-07-2018 | 23-07-2018 | 30-07-2018 | 6/8/2018 | 13-08-2018 | 20-08-2018 | 21-08-2018 | 27-08-2018 to 30-08-2018 | 10/9/2018 |
| 2 | B.Sc. (Hons) Horticulture | 7/7/2018 | 13-07-2018 | 17-07-2018 | 23-07-2018 | 30-07-2018 | 6/8/2018 | 13-08-2018 | 20-08-2018 | 21-08-2018 | 27-08-2018 to 30-08-2018 | 10/9/2018 |
| 3 | B.Sc. (Hons) Forestry | 7/7/2018 | 13-07-2018 | 17-07-2018 | 23-07-2018 | 30-07-2018 | 6/8/2018 | 13-08-2018 | 20-08-2018 | 21-08-2018 | 27-08-2018 to 30-08-2018 | 10/9/2018 |
| 4 | B. Tech. (Agricultural Engineering) | 7/7/2018 | 13-07-2018 | 17-07-2018 | 23-07-2018 | 30-07-2018 | 6/8/2018 | 13-08-2018 | 20-08-2018 | 21-08-2018 | 27-08-2018 to 30-08-2018 | 10/9/2018 |
| 5 | B. Tech. (Food Technology) | 7/7/2018 | 13-07-2018 | 17-07-2018 | 23-07-2018 | 30-07-2018 | 6/8/2018 | 13-08-2018 | 20-08-2018 | 21-08-2018 | 27-08-2018 to 30-08-2018 | 10/9/2018 |
| 6 | B.Sc. (Hons) Community Science | 7/7/2018 | 13-07-2018 | 17-07-2018 | 23-07-2018 | 30-07-2018 | 6/8/2018 | 13-08-2018 | 20-08-2018 | 21-08-2018 | 27-08-2018 to 30-08-2018 | 10/9/2018 |
| 7 | B. Tech. (Biotechnology) | 7/7/2018 | 13-07-2018 | 17-07-2018 | 23-07-2018 | 30-07-2018 | 6/8/2018 | 13-08-2018 | 20-08-2018 | 21-08-2018 | 27-08-2018 to 30-08-2018 | 10/9/2018 |

**NOTE - Please submit the above information within one hour.**

Sd/-
**Director (Education)**

Sd/-
**Director General /Nodal Officer**